# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय/राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय ठाणे.

## परिचारीका संवर्गातील पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात.

---

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील " **परिचारीका** " संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याच्या (१७९ दिवस) कालावधीसाठी भरणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृह, स्थायी समिती सभागृह, तिसरा मजला, प्रशासकीय भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी पाचपाखाडी, ठाणे येथे **दि. २२/११/२०२३** रोजी सकाळी ११:०० वाजता थेट मुलाखतीस (WALK IN INTERVIEW) उपस्थित रहावे.

उमेदवारांनी सर्व कागदपत्र/प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी दोन प्रतींमध्ये स्वयंसाक्षांकित/प्रमाणित करुन सादर करावीत. जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता धारण करत नसलेले उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचीच मुलाखत घेतली जाईल.

ठाणे महानगरपालिकेच्या रुग्णालयात तसेच कोव्हिड-१९ कालावधीमध्ये ठाणे महानगरपालिकेकडे परिचारीका म्हणुन सेवा दिलेल्या उमेदवारांस प्राधान्य,असेल.

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय करिता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरीता परिचारीका संवर्गातील पदे भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या व शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे.

Mahabharti.in

| अ .क्र. | पदनाम व पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा मानधन | वय |
|---|---|---|---|---|
| १ | **परिचारिका**<br>अनुसूचित जाती १३% — १३<br>अनुसूचित जमाती ७% — ७<br>विमुक्त जाती (अ)३% — ३<br>भटक्या जमाती (ब)२.५% — २<br>भटक्या जमाती (क)३.५% — ४<br>भटक्या जमाती (ड)२% — २<br>विशेष मागास प्रवर्ग२% — २<br>इतर मागास प्रवर्ग १९% — १९<br>आर्थिक दुर्बल घटक (EWS) १०% — १०<br>खुला ३८% — ३८<br>एकूण — १०० | १. महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (H.S.C)<br>२.महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी पदविका (जी.एन.एम.)<br>३.बी.एस्सी. (नर्सिंग) असल्यास प्राधान्य.<br>४.महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>५.शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेकडील नर्स मिडवाईफ/ परिचारिका/ स्टाफ नर्स या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>६.ठाणे महानगरपालिकेच्या अधिनस्त परिचर्या प्रशिक्षण संस्थेकडील सुधारित जनरल नर्सिंग व मिडवाईफ किंवा बी.एस्सी (नर्सिंग) पूर्ण केलेल्या उमेदवारांस प्राधान्य.<br>७.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | ३०,०००/- | शासन निर्णय क्र.सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२ दि. ०३ मार्च २०२३ अन्वये कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४५ वर्षे. |

मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मान्यतेने.

Sd/-
अतिरिक्त आयुक्त -२
ठाणे महानगरपालिका ठाणे.